आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील सरपंच-उपसरपंच यांच्या मानधनात, दुप्पट वाढ करण्यास तसंच छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर इथल्या राष्ट्रीय विधी विद्यापीठांना सात कोटी रूपयाचा निधीला मंजुरी.

2. लहान मुलांचे अश्लील साहित्य डाउनलोड करणे, पाहणे आणि साठवणे हा पॉक्सो आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय; "चाइल्ड पोर्नोग्राफी" हा शब्द न वापरण्याचेही जारी केले निर्देश.

3. आज सकाळी मेळघाटात सेमाडोह जवळ खासगी बस नदीत कोसळून झालेल्या अपघातात चार प्रवाशांचा मृत्यू, 25 जखमी; मदत कार्य सुरु.

4. २०२५ मधे ऑस्करच्या शर्यतीत 'बेस्ट फॉरेन फिल्म' विभागात भारताचं प्रतिनिधित्व आमिर खान आणि किरण राव दिग्दर्शित 'लापता लेडीज' ही फिल्म करणार.

****

राज्य मंत्रिमंडळ बैठक निर्णय

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयामध्ये, राज्यातील सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात, दुप्पट वाढ, ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून, ग्रामपंचायत अधिकारी पद निर्माण करणे, यवतमाळ, जळगांव जिल्ह्यातील सूतगिरणींना, थकबाकी परत फेडीसाठी हप्ते, धान उत्पादकांना दिलासा म्हणुन आता, प्रति क्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर देणे, ब्राह्मण समाजासाठी, परशुराम आर्थिक विकास महामंडळ तर राजपूत समाजासाठी, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळांची स्थापनेस मंजुरी, छत्रपती संभाजीनगर तसंच नागपूर इथल्या राष्ट्रीय विधी विद्यापीठांना सात कोटी रूपयाचा निधीला मंजुरी या निर्णयांचा समावेश आहे. इतर निर्णयांमध्ये, लोहगाव विमानतळाचे नाव, जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे असं करण्याचा निर्णय, दूध अनुदान योजने अंतर्गत, दुध उत्पादकांना गायीच्या दूधासाठी लीटरमागे सात रुपयांचे अनुदान, जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी या निर्णयांचा समावेश आहे.

## चाइल्ड पोर्नोग्राफी

सर्वोच्च न्यायालयानं आज एका ऐतिहासिक खटल्यात लहान मुलांचं अश्लील साहित्य डाउनलोड करणे, पाहणे आणि साठवणे हा पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा असल्याचा निर्णय दिला आहे. केवळ चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड करणे आणि पाहणे हा पॉक्सो कायदा आणि आयटी कायद्यानुसार गुन्हा नसल्याचा मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत, सरन्यायाधीश डॉ.डी.वाय.चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील, न्यायमूर्ती जे.बी.पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठानं हा निकाल दिला. यासोबतच संसदेला "चाइल्ड पोर्नोग्राफी" या शब्दाच्या जागी, "चाइल्ड सेक्शुअल एक्स्प्लो-इटेटिव्ह अँड अब्यूज मटेरियल" असा अध्यादेश आणण्याची सूचना देखील, सर्वोच्च न्यायालयानं केली आहे. त्याचप्रमाणे भारतातील सर्व न्यायालयांना त्यांच्या न्यायिक आदेश आणि निकालांमध्ये, यापुढे "चाइल्ड पोर्नोग्राफी" हा शब्द वापरू नये असे निर्देश, जारी केले आहेत.

## सुंदर पिचाई/मोदी दौरा

गुगल कंपनी भारतात, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात गुंतवणूक करणार असल्याची माहिती, गुगलचे सी.ई.ओ. सुंदर पिचाई यांनी दिली. अमेरिका दौऱ्यावर असणारे पंतप्रधान, नरेंद्र मोदी यांनी टेक कंपन्यांच्या प्रमुखांसोबत घेतलेल्या बैठकीनंतर पिचाई बोलत होते. 'भारतात आम्ही आमची भागीदारी निश्चित केली आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, भारतीय जनतेच्या फायद्यासाठी असून, याचा वापर भारतीयांच्या सेवेसाठी असला पाहिजे अशी पंतप्रधान मोदी यांची दृष्टी आहे. त्यांचा हा दृष्टीकोन आम्हाला, ए.आय. क्षेत्रात अधिक काम करण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याचही, सुंदर पिचाई यांनी सांगितलं.

## निवडणूक आयोग पथक

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त, राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय निवडणूक आयोगाचं पथक, २६ ते २८ सप्टेंबर या दरम्यान महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहे. या काळात राज्यातले विविध राजकीय पक्ष, राज्य निवडणूक आयोग, सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या सोबत आयोगाचं पथक बैठक घेणार आहे. २८ सप्टेंबरला मुंबईत आयोगाची वार्ताहर परिषद होईल यात, राज्यातल्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

अश्विनी वैष्णव

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आज एका दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर आले आहेत. केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा, ते आज घेत आहेत. तत्पूर्वी आज सकाळी जे.पी.मॉर्गन भारतीय गुंतवणूकदार परिषदेत ते सहभागी झाले होते.

केंद्र सरकारचे १०० दिवस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं तिसऱ्या कार्यकाळातील शंभर दिवस नुकतेच पूर्ण केले. सरकारनं पहिल्या शंभर दिवसांत सामाजिक कल्याण योजनांच्या माध्यमातून नागरिकांच्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणले आहे. पंतप्रधान जनजातीय उन्नत ग्राम अभियानाच्या माध्यमातून, आदिवासी समुदायाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचं काम करण्यात येत आहे. देशातील ६३ हजार तर, महाराष्ट्रातील चार हजार ९७६ आदिवासी गावांचा याद्वारे कायापालट होणार आहे. यात चंद्रपूर जिल्ह्यातील १६७ गावांचा समावेश आहे. पंतप्रधान जनजाती आदिवासी न्याय महाअभिमान, पीएम-जनमन अभियानात १७ मंत्रालयांद्वारे राबवण्यात येणाऱ्या विविध, २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. त्याद्वारे सामाजिक पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, आजीविका यामधील तफावत भरून काढण्याचा प्रयत्न असणार आहे.

मेळघाट अपघात

आज सकाळी मेळघाटात सेमाडोह जवळ अमरावती वरून धारणीकडे जाणाऱ्या खाजगी बसला अपघात होऊन बस नदीपात्रात कोसळल्यामुळ त्यातील चार प्रवाशांचा मृत्यू झाला असून, २५ जखमी प्रवाशांना, अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ आणण्यात आलं असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे. त्यापैकी सात प्रवासी गंभीर जखमी असल्यानं, त्यांना अमरावतीच्या जिल्हा शासकीय रुग्णालय इथं हलवण्यात आलं असून, उर्वरित अठरा प्रवाशांचा उपचार अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात सुरु आहे. घटनास्थळी पोलिसांकडून स्थानिक नागरिकांच्या सहकार्यानं मदत कार्य राबविण्यात येत असल्याची माहिती, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, किरण वानखेडे यांनी दिली. दरम्यान, व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी देखील मदत कार्यासाठी घटनास्थळी पोहोचले आहेत.

लापता लेडीज

२०२५ मध्ये होणाऱ्या ऑस्कर या अकादमी पुरस्कार सोहळयासाठी भारताकडून 'लापता लेडीज' हा चित्रपट पाठवण्यात येणार आहे. आमिर खान आणि किरण राव दिग्दर्शित हा चित्रपट, 'बेस्ट फॉरेन फिल्म' विभागात भारताचं प्रतिनिधित्व करेल असं, भारतीय चित्रपट महामंडळानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. स्त्रियांची सामाजिक अवस्था आणि स्त्री शिक्षण, प्रेरणा अशा स्त्रीवादी संकल्पना या सिनेमात मांडल्या गेल्या आहेत.

शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण

नागपूरजवळील कळमेश्वर इथे सावित्रीबाई फुले ज्ञानवर्धन ग्रंथालय समाजभूषण संस्था आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या संयुक्त विद्यमानं पंचवीस फूट उंच, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचं अनावरण, शिवसेनाप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते २९ सप्टेंबर रोजी, सायंकाळी पाच वाजता होणार असल्याची माहिती, काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री आमदार सुनील केदार यांनी आज नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत दिली. या सोहळयाला, रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, अनिल देशमुख तसंच शिवसेनेतील नेते आणि महाविकास आघाडीतील नेते, उपस्थित राहणार असून, अनावरणानंतर एका जाहीर सभेला सुद्धा, उद्धव ठाकरे संबोधित करतील अशी माहिती, केदार यांनी दिली.

अपघात

भंडारा जिल्ह्यात अड्याळ-पवनी महामार्गावरील नवेगाव जवळ, मित्रासाठी नवीन मोबाईल घेऊन दुचाकीनं परत येत असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकला समोरासमोर धडक होऊन दोन तरुण जागीच ठार झाले तर एक जण जखमी झाला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

मृत वाघ

गोंदिया जिल्ह्यातील नागझिरा अभयारण्यातील मंगेझरी जंगलात मृत अवस्थेत वाघ आढळुन आला. वन विभागाचे कर्मचारी गस्त घालत असताना जंगलात मृतावस्थेत हा वाघ आढळल्यानंतर डॉक्टरांची चमू बोलावून शवविच्छेदन करण्यात आलं. दोन वाघांच्या झुंजीत टी-9 वाघ बेशुद्ध होऊन मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी -अमेरिका

जगातल्या प्रत्येक क्षेत्रात, विकासा करता तंत्रज्ञानाची आवश्यकता असून, तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अमेरीका दौऱ्यात न्यूयार्कमध्ये अमेरीकेतल्या तंत्रज्ञान क्षेत्रामधल्या आघाडीच्या कंपन्यांच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांची गोलमेज परिषद पंतप्रधान मोदी यांनी घेतली. त्यावेळी ते बोलत होते. कृत्रिम बुद्धीमत्ता, जैव तंत्रज्ञान आणि सेमी कंडक्टर तंत्रज्ञान यावर या परिषदेनं भर दिला. भारतासह जगभरात, सगळीकडे नवनव्या तंत्रज्ञानाचा होत असलेला वापर आणि त्यातून सामान्यांना होणारा लाभ याबद्दल परिषदेत चर्चा झाली. तंत्रज्ञान आणि लोकशाही यांचं एकत्रीकरण म्हणजे मानवी कल्याणाची हमी आहे असं, पंतप्रधान यावेळी म्हणाले. विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहभागाबद्दल मोदी यांनी यावेळी चर्चा केली. दरम्यान, अमेरिकेतला भारतीय समुदाय म्हणजे, भारताचे सदिच्छा दूत असल्याचं पंतप्रधानानीं न्यूयॉर्कमधील, लाँग आयलंड इथं, भारतीय समुदायातर्फे आयोजित कार्यक्रमात सांगितलं.

## हवामान

येत्या काही तासात विदर्भातील अमरावती, गडचिरोली, वर्धा, वाशीम आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. गोंदिया, चंद्रपूर, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि भंडारा जिल्ह्यांत, तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, संपूर्ण विदर्भात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पंधरा दिवसांच्या विश्रांतीनंतर, अमरावती शहरासह जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसानं हजेरी लावली आहे. काल मध्यरात्रीपासून आज दुपारी बारापर्यंत, जिल्ह्याच्या बहुतांश ग्रामीण भागात तर, काल सायंकाळी चार वाजल्या पासून, अमरावती शहरात पाऊस झाला. सोयाबीन पिकाला या पावसाचा चांगलाच फायदा होणार असल्यानं शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. वर्धा नदीच्या पाणलोट क्षेत्रात, मुसळधार पाऊस होत असल्यानं, पश्चिम विदर्भातल्या अप्पर वर्धा धरणाचे तेरा पैकी नऊ दरवाजे, काल रात्री उघडण्यात आले. त्यातून ५१४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग, नदी पात्रात होत आहे.

*****